MHNS160010752019

**<u>नियमीत दिवाणी दावा क्र. ६९/२०१९ मध्ये निशाणी ६४ खाली आदेश</u>**

**फकीरा पाचोरकर वि. माधव पाचोरकर**

१. सदरचा अर्ज वादीने अबेटमेंट दूर होऊन मिळण्यासाठी दिलेला आहे. सदर अर्जामध्ये वादीने कथन केले आहे की, सदरचा दावा न्यायप्रविष्ठ असतांना प्रतिवादी क्र. ५ रखमाबाई वक्टे या दि.१८.०६.२०२० रोजी मयत झालेल्या आहेत. मयत प्रतिवादीचे वारस कायद्यानुसार ९० दिवसांत रेकॉर्डवर घेणे गरजेचे आहे. मात्र त्याबाबत वादी अडाणी असल्यामुळे त्यांना माहिती नाही. तसेच प्रतिवादी क्र. ५ मयत झाल्याबाबत प्रतिवादींनी अभिपटलावर वेळेमध्ये पुरसिस न दिल्यामुळे वादींना मयत प्रतिवादी क्र. ५ चे वारस वेळेमध्ये रेकॉर्डवर घेता आले नाहीत व त्यामुळे सदर मयत प्रतिवादीविरुद्ध दावा अबेट झालेला आहे. त्यामुळे मयत प्रतिवादी क्र. ५ विरुद्ध झालेली अबेटमेंट दूर करण्याची परवानगी मिळण्यासाठी वादीने सदरचा अर्ज दिलेला आहे.

२. प्रस्तुत अर्जाला प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे दिलेले असून अर्जामध्ये नमुद केलेले कारण योग्य नसल्यामुळे सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती प्रतिवादीने केलेली आहे.

३. वादींचा अर्ज व त्यावरील प्रतिवादींचे म्हणणे वाचले. दोन्ही विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुतच्या अर्जानुसार प्रतिवादी क्र. ५ हे सन २०२० मध्ये मयत झालेले आहेत व त्यानंतर जवळपास ४ वर्षांच्या विलंबाने वादींनी सदरचा अर्ज दिलेला आहे. इतक्या मोठ्या विलंबासाठी वादीने त्यांच्या अर्जामध्ये कोणतेही संयुक्तिक कारण दिलेले नाही. मात्र असे असले तरी सदरचा दावा दिवाणी असल्यामुळे मयत प्रतिवादी क्र. ५ विरुद्ध झालेला अबेटमेंटचा

आदेश सेट असाईड करुन मयत प्रतिवादी क्र. ५ चे वारस अभिपटलावर घेण्याची संधी वादीला देणे कायद्यानुसार गरजेचे आहे. मात्र प्रस्तुतकामी वादीमुळे जो प्रचंड विलंब झालेला आहे. त्यासाठी वादीवर दंड आकारणी करणे न्यायोचित ठरेल असे मला वाटते. सबब, वरील सर्व विवेचनाच्या अनुषंगाने मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**– आदेश –**

१. वादींचा प्रस्तुतचा अर्ज वादीने र.रु. ५००/– प्रतिवादींना देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. सदरचे प्रकरण जुने असल्यामुळे दोन्ही पक्षकार व त्यांच्या विधिज्ञांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी सदर दाव्याचे काम जलदगतीने चालवावे.

SUNGARE VRUSHALI DINANATH

Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2026.07.06 18:55:18 +0530

दिनांक :– ०६.०७.२०२६
ठिकाण :– चांदवड

(वृषाली दी. सुंगारे)
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
चांदवड.

## <u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, या पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या आदेशामधील शब्द–नि–शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | :– | ***एस. आर. हटकर,***<br>लघुलेखक (श्रेणी–३) |
| न्यायालयाचे नाव | :– | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग क.स्तर, चांदवड. |
| आदेशाची तारीख | :– | ०६/०७/२०२६ |
| आदेशावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | :– | ०६/०७/२०२६ |
| आदेश अपलोड केल्याची तारीख | :– | ०६/०७/२०२६ |